म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. ४५२ दिनांक .......
विषय ........ क्र. ..........

# गंमत जंमत

के. एस. देशमुख

BVBK-0400452

अनंत प्रकाशन, पुणे

मुद्रक :
ले. कर्नल वि. वा. जोशी
सकाळ छापखाना
५९५, बुधवार पेठ,
पुणे ४११ ००२.

प्रकाशिका :
सौ. अर्चना अनंत टोळ
अनंत प्रकाशन
४३३/३ सारस्वत कॉलनी, पुणे ११.

सजावट, मांडणी
ल. म. कडू

प्रथमावृत्ती : मार्च १९७८

**मूल्य दोन रुपये**



१

काटेरी अंग
कोकणात फार
पोटाला मात्र
छान छान गार

२

चंद्र असो की सूर्य असो
लपवून ठेवी घटकाभर
सांगा मग तर प्राणी मोठा
कोण असे हा खरोखर



BVBK-0400452

३

एक राणी घाईची
क्षणभर फक्त थांबायची



४

खांब असो की भिंत असो
जाऊन बसते आरामात
लाल असे हो रंगच माझा
सुखदुःखे हो माझ्या आत

५

चिखलामध्ये जन्म जाहला
लाल गुलाबी रंग असे
पाण्यावरती डोके काढी
सरोवरी हे छान हसे



६

ताऱ्याजैसा लख्कन् चमके
प्राणी इवला इवला
तृण पात्यावरती बसतो
छान किती सानूला

७

कु कु च कू कु कु च कू
कोण ओरडे जोराने
तुरा त्याच्या डोक्यावरती
चाले कैसा ऐटीने



८


पाऊस येता फुगून येते
आनंदाने नाच नाचते
कुठून येतसे कुणा न दिसे
ओळखाल का ? कोण असे

९

कधी होई मोठा मोठा
कधी अगदीच छोटा छोटा
सांगा चट्कन् नाव तयाचे
पैसा देतो खोटा खोटा

१०

असेल तुमचे रूप जसे
दाखवी तुम्हा तोच तसे



११

कोण असेल असा एक
ज्याला आहे एकच कान
उपयोगी मात्र आहे खूप
घराघरात असतो मान

१२

दोन शिंगे डोक्यावर
वेग ह्याचा वाऱ्यावर
रानामध्ये शेतामध्ये
भिऊन पळते दूरवर

१३

हिरवा हिरवा माझा रंग
पेरू खातो आवडीने
लाल लाल माझे तोंड
बोलतो किती गोडीने



१४

चंद्रासंगे सोबत हिची
छोटी छोटी राणी
कैक पसरली रूपे हिची
निळ्या निळ्या गगनी

१५

तुरुतुरू चालते
पोटात पाय
पाठीवर गाठोडं
नाव काय ?

१६

बत्तीस जणाना ठेवते गुपचूप
स्वतःच बोलते खूप खूप खूप




१७

एक तोंड एक कान
नंबर दहा छातीवर
टिरींग टिरींग घंटी देऊन
बोलतो किती लांबवर

१८

आमचा उखाणा फारच सोपा
निळ्या निळ्या रंगाचा
पृथ्वीवरती साऱ्या पसरला
मांडव बिनखांबाचा

१९


काम केले सेतुवर
तीन रेषा पाठीवर
गोंडेदार शेपूट हिचे
पळते झाडाझाडावर

२०

टक् टक् चोवीस तास
गोल गोल सारा प्रवास
रूपे किती ? आकार किती ?
भिंतीवरती हातावरती
असे हे आहे बरं का
भारीच खटयाळ
ओळखलेत का ह्याला तुम्ही
हे तर आपले × × ×

२१

अळी मिळी गुपचळी
शिंपल्यात बसलाय सागर तळी
ओळखील तो शहाणा किती ?
हा तर आहे किंमती



२२

पिवळा पिवळा रंग जयाचा
डौल डौलते डौलात
सूर्य जयाच्या नावामध्ये
फूल कोणते शेतात ?

२३


तोंड उघडा कान पिळा
खरखर करतो ह्याचा गळा
भाषण ऐका गाणे ऐका
तुम्हा आम्हा ह्याचा लळा

२४

अर्धी काळी अर्धी पिवळी
वेगामधली ही राणी
झर्रकन् जाते, झर्रकन् येते
सांगा नाव तरी कुणी


२५

दात आहेत, तोंड नाही
प्रत्येकाच्या असतो घरी
रोज रोज पडतो कामा
रंग आकार किती तरी ?




२६

डोक्यावर टोपी फक्कडबाज
गालावर कल्ले आक्कडबाज
कोण शिपाई पक्षी हा
पी ऽ पी ऽ गातो सुंदर पहा



२७

आकाशाची मजा पाहुनी
पृथ्वीवरती येतो मी
जाणे येणे तुमच्या हाती
मी तर आहे चौकोनी



२८

हात नाही पाय नाही
कान मात्र आहेत दोन
खमंग खमंग पदार्थ तळा
सांगा मग तर आहे कोण ?

२९


नाकावरती विराजमान हा
भलतीच ह्याची शान
खूप रंग, खूप आकार
उन्हात असते ह्याचे काम

३०

घोड्या जैसे रूप जयाचे
पट्टे पट्टे अंगावर
राणीबागेत दिसते मात्र
दृष्टी खिळते ह्याच्यावर

३१

डरॉव डरॉव आवाजाचा
ओळखा कोण प्राणी ?
कधी हवी जमीन
तर कधी हवे पाणी



३२

एक नाही, दोन नाही
खूप असतात प्रवासी
त्यांना घेऊन जात असते
मार्ग त्याचा आकाशी




३३

मुठीत ठेवले
निळे पाणी
घरात मळ्यात
सांगा कुणी

३४

चार पाय दोन हात
लहानमोठ्या असते घरी
अभ्यास करा, लिहीत बसा
छानपैकी बसून वरी



३५

माझ्यामुळेच कळत असतात
तारखा आणि दिवस सारे
बहुतेक घरी भिंतीवरती
लटकत असते ऐटीत मारे

३६

दोन पाय गोल गोल
फिरते गल्ली बोळात

३७

मेघ जमता आकाशी
आनंदाने नाचे हा
सप्तरंगी पिसारा
छान किती पहा पहा



३८

काळे काळे रूप माझे
एक पाय आठ हात
विशेष करून येई आठवण
तुम्हा माझी उन्हापावसात

३९

फिर म्हणता फिरतो
थांब म्हणता थांबतो
फिरून फिरून देतो वारा
–पण कमाल मात्र एकच याची
जागेवरचा सरकत नाही.

BVBK-0400452

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय वि. पंधरा
८५२
विषय... 

१ फणस
२ ढग
३ लोकलगाडी
४ पत्रपेटी
५ कमळाचे फूल
६ काजवा
७ कोंबडा
८ नदी
९ चांदोबा
१० आरसा
११ कप
१२ हरीण
१३ पोपट
१४ चांदणी
१५ गोगलगाय
१६ जीभ
१७ टेलिफोन
१८ आकाश
१९ खार
२० घड्याळ
२१ मोती
२२ सूर्यफूल
२३ रेडिओ
२४ टॅक्सी
२५ कंगवा
२६ बुलबुल पक्षी
२७ पतंग
२८ कढई
२९ गॉगल
३० झेब्रा
३१ बेडूक
३२ विमान
३३ आडा-विहीर
३४ खुर्ची
३५ कॅलेंडर
३६ सायकल
३७ मोर
३८ छत्री
३९ पंखा

